# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.04.2024** **वारःमंगळवार**

---

1. देशाच्या विकासाला गती मिळण्यासाठी आर्थिक शिस्त महत्वाची-उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं प्रतिपादन
2. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी विविध पक्षाच्या उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज दाखल
3. वाढत्या तापमानात जनावरांची काळजी घेण्याचा पशुसंवर्धन विभागाचा सल्ला आणि
4. शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी, या वर्षी मान्सून सरासरी ओलांडण्याचा - हवामान विभागाचा अंदाज

**धनखड**

करप्रणालीमध्ये डिजिटायझेशन झाल्यामुळे करप्रणाली अधिक पारदर्शक झाली असून करचोरीला आळा घातला जात असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी काल नागपूरमध्ये केलं. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीमध्ये भारतीय महसूल सेवेच्या 76 व्या तुकडीच्या प्रशिक्षणाच्या समारोप सत्रात धनखड बोलत होते. देशाच्या विकासाला गती मिळण्यासाठी आर्थिक शिस्त महत्वाची असून कृत्रिम तंत्रज्ञान आणि प्रगत विश्लेषण प्रणाली यामुळे करदात्यांचा व्यवस्थेवर विश्वास वाढतो आणि त्यातूनच नियमित करभरणा करण्याकडे नागरिकांचा कल राहतो, असं उपराष्ट्रपती म्हणाले. तुमच्या सेवा काळात तुमचा उद्योजकांशी सतत संपर्क राहील. या उद्योजकांना 'लोकल फॉर व्होकल' साठी प्रेरित करावं, असा सल्ला त्यांनी नवनियुक्त अधिकाऱ्यांना दिला. राज्यपाल रमेश बैस आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष नितीन गुप्ता या वेळी उपस्थित होते. उपराष्ट्रपतींच्या हस्ते विविध विषयात प्राविण्य मिळवणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या तुकडीमध्ये 58 अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केलं. यामध्ये 24 महिला आहेत.

**उमेदवारी अर्ज-सोलापूर, कोल्हापूर, सातारा, रायगड, सांगली**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी काल विविध पक्षांच्या उमेदवारांनी आपापल्या मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल केले. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले आणि कोल्हापूर या दोन्ही लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार अनुक्रमे संजय मंडलिक आणि धैर्यशील माने यांनी काल, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. कोल्हापुरातच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी देखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सातारा लोकसभा मतदार संघातील निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या वतीनं आमदार शशिकांत शिंदे, माढा लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार रमेश बारस्कर, रायगड लोकसभा मतदार संघातून इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्यासह पाच उमेदवारांनी तर सांगली लोकसभा मतदार संघातून विशाल पाटील आणि सतीश कदम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

**धुळे-टपाली मतदान**

धुळे आणि नंदूरबार लोकसभा मतदारसंघात, मतदानाच्या दिवशी निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क टपाली मतपत्रिकेद्वारे बजावता यावा, यासाठी 'मतदार सुलभता केंद्र' स्थापन करण्यात आलं आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तसंच जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. नंदुरबार लोकसभा मतदारसंघासाठी 13 मे आणि धुळे लोकसभा मतदारसंघासाठी 20 मे या दिवशी मतदान होणार आहे.

**नांदेड-मतदानजागृती**

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी काल मतदान जनजागृतीसाठी एक अभिनव कल्पना लढवत नांदेड एस. टी. बसस्थानकावरील, प्रवाशांना सूचना देण्याच्या ध्वनीक्षेपकावरून त्यांनी 'स्वीप' उपक्रमाअंतर्गत, मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्याचं आवाहन केलं. या प्रसंगी नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे उपस्थित होते.

**सातारा-मतदानसुट्टी**

सातारा लोकसभा मतदार संघात 7 मे रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदार संघामधील नागरिकांना मतदान करता यावे यासाठी मंगळवार, 7 मे राजी सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आलेली आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. या बाबतची अधिसूचना काढण्यात आली असून, सर्व शासकीय कार्यालयं, निमशासकीय कार्यालयं, सार्वजनिक उपक्रम आणि इतर प्रतिष्ठान यांना ही अधिसूचना लागू राहील.

**निवडणूक कर्मचारी**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त झालेल्या सरकारी कर्मचारी, अधिकारी, तसंच शालेय शिक्षक अथवा महाविद्यालयीन प्राध्यापक आणि इतर कर्मचाऱ्यांनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या प्रचार मोहिमेत सहभागी न होण्याचे स्पष्ट आदेश पुण्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत. लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदीनुसार, नियुक्त झालेला कोणताही कर्मचारी प्रचार कार्यात आढळून आल्यास त्याच्याविरुद्ध थेट कारवाई करण्याचा इशारा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिला आहे.

**आंबेगाव-कर्मचारी प्रशिक्षण**

पुणे जिल्ह्यातील शिरुर लोकसभा मतदारसंघाअंतर्गत, आंबेगाव विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या 2273 क्षेत्रीय अधिकारी, समन्वय अधिकारी तसंच मतदान केंद्रावर प्रत्यक्ष काम करणारे केंद्रप्रमुख आणि सहाय्यक अधिकारी कर्मचारी यांना मतदान प्रक्रिया, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट हाताळणीबाबत अवसरी इथल्या तंत्रनिकेतनच्या सभागृहात प्रशिक्षण देण्यात आलं.

**पाणी टंचाई**

पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणात अत्यंत कमी पाणीसाठा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाणी बचतीचं गांभीर्य लक्षात घेऊन पाण्याचा वापर काटेकोरपणे केलाच पाहिजे. ऐकू या त्याबद्दलचा आमच्या प्रतिनिधीचा हा वास्तविक वृत्तांत...

**एकीकडे पावसाळा सुरू होईपर्यंत धरणातील उपलब्ध पाणी साठा वापरण्याचं मोठं आव्हान प्रशासनापुढं उभं आहे. दुसरीकडे पुण्याच्या अनेक भागात गाड्यांपासुन ते बंगल्याचे आवार धुण्यापर्यंत सर्रास महापालिकेच्या पाण्याचा वापर सुरू असल्याचं दिसून आलं आहे. बांधकामासाठी प्रक्रियाकृत सांडपाणी वापरणे अनिवार्य आहे. मात्र घरगुती वापरासाठी टँकर आणि बांधकामासाठी नळाचे पाणी वापरलं जात असल्याचं देखील आढळून आले आहे. शहरातील चांगल्या आणि सुशिक्षित भागात हे चित्र दिसून आल्याने पुणेकरांनी पाणी जपून वापरण्यासाठी सजग राहणे हाच एकमेव पर्याय पावसाळा सुरु होईपर्यंत हातात आहे. गेल्या वर्षी पाऊस सुमारे दीड महिन्यांनी सुरू झाला आणि जास्त काळ राहिला नाही. प्रशासनानं पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांविरूद्ध कारवाईचा इशारा दिला आहे पण नागरिकांनी कारवाई होईपर्यंत वाट पाहण्याची गरज नाही. अन्यथा पाण्याची कठीण परिस्थिती ओढवेल एवढे मात्र निश्चित. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून विनायक सोमणी.**

**<u>कार्यकारिणी</u>**

अखिल भारतीय साहित्य परिषदेद्वारे पुरस्कृत साहित्य भारतीची यावर्षासाठी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी काल जाहीर करण्यात आली. तिचा कार्यकाळ आगामी वर्षभराचा राहील. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखक नामदेव कांबळे प्रदेश अध्यक्ष तर नांदेडचे प्राध्यापक डॉक्टर पृथ्वीराज तौर महामंत्री असतील. प्राध्यापक विसुभाऊ बापट, डॉक्टर रविंद्र बेंबरे आणि अविनाश पाठक यांची उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**<u>महालक्ष्मी-कोल्हापूर</u>**

कोल्हापूरमधल्या श्री महालक्ष्मी देवीच्या मूर्तीची संवर्धन प्रक्रिया पूर्ण झाली असून आजपासून भाविकांना देवीचं दर्शन पूर्ववत घेता येईल, असं देवस्थानाकडून जाहीर करण्यात आलं आहे. अंबाबाई देवीच्या मूर्तीची संवर्धन प्रक्रिया पुरातत्व रसायनतज्ञ विभागाच्या तज्ज्ञांकडून गेल्या दोन दिवसांत पूर्ण करण्यात आली.

**<u>नांदेड-अग्निशमन सेवासाप्ताह</u>**

नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या 'अग्निशमन सेवा सप्ताहा'ला जिल्हाधिकारी अभिजित राउत यांच्या हस्ते प्रारंभ झाला असून, 20 एप्रिलपर्यंत अग्निशमन सेवांबाबत जनजागृती केली जाणार आहे. आग प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता आहे असं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सांगितलं.

**<u>आचारसंहिता-अहमदनगर, बुलडाणा, गडचिरोली</u>**

उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास नागरिकांना टोल फ्री क्रमांक 1950 किंवा सी- व्हिजील या ॲपवरून तक्रार करता येत असून आतापर्यंत अहमदनगर जिल्ह्यातील आचारसंहिता कक्षाकडे 95 तक्रारी प्राप्त झाल्या असल्याची महिती अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी दिली आहे. बुलडाणा जिल्ह्यातही राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबवलेल्या विशेष मोहिमेत आचारसंहिताभंगाचे 167 गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या प्रकरणी 170 आरोपींना अटक करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्ह्यात, तपासणी पथकानं दोन प्रकरणात 11 लाख 100 रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे.

**<u>उन्हाळा जनावरे-अकोला, नाशिक</u>**

येत्या काही दिवसात तापमानाचा पारा आणखी वाढण्याचा हवामान विभागाचा अंदाज असल्यानं, जनावरांनी उष्माघाताचा धोका संभवतो, त्यामुळे जनावरांची काळजी घेण्याचा सल्ला पशुसंवर्धन विभागाने दिला आहे. वाढतं तापमान आणि उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्यासाठी पशुपालकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असं आवाहन पशुसंवर्धन विभागानं केलं आहे. नाशिकमध्ये पारा चाळिशीवर गेला असून मालेगाव इथं त्यानं 42 अंशांपर्यंत मजल मारली आहे. एकीकडे उन्हाचा तडाखा बसत असताना सुरगणा, दिंडोरी तालुक्यात पावसानं हजेरी लावली, नाशिक शहरात सायंकाळी थेंब थेंब पाऊस झाला.

**<u>मान्सून</u>**

यावर्षी देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं, भूविज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन यांनी म्हंटलं आहे. नैऋत्य मोसमी पावसाच्या अंदाजाबाबत काल नवी दिल्ली इथं बातमीदारांनी त्यांही ही माहिती दिली. जून ते सप्टेंबर या कालावधीत सामान्य पावसाच्या तुलनेत, सरासरी 106 टक्के पाउस पडण्याची शक्यता आहे असं त्यांनी सांगितलं. वायव्य, पूर्व आणि ईशान्येकडील राज्यांतील काही भागात पाऊस सरासरीपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. 1 जून ते 30 सप्टेंबर या कालावधीत संपूर्ण देशाच्या एकंदर पावसाची सरासरी 87 सेंटीमीटर असेल अशी माहिती, भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी यावेळी दिली.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**